नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 03/01/2022 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील मौजा मोखाळा फाटा येथे दिनांक 31/12/2021 चे 19:00 वा. ते 19.15 वा. दरम्यान एमएच– 40/बीडी– 4094 क्रमांकाच्या मोटरसायकलचा चालक नामे– प्रदीप कवडुजी ढोरे (मृतक) वय 34 वर्ष रा. तातोली ता.भिवापुर जि.नागपुर याने आपल्या मोटरसायकलवर डबरसिट बसवुन तातोली येथे जात होता. त्यादरम्यान नक्षी रोडने एमएच– 31/बीक्यु– 1210 क्रमांकाच्या विक्टर मोटरसायकला मृतक आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन धडक दिली. या अपघातात विक्टरचे चालकाचे उजव्या पायाला गंभीर मार लागुन जखमी झाला. तसेच प्रदीप ढोरे हा जखमी होवुन स्वतःचे मरणास कारणीभुत ठरला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोहवा विनोद झाडे पोस्टे भिवापुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 181 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि शरद भस्मे मो.क्र. 9764946808 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील घूबडमेठ शिवारात समीर कॉटनमिल चे जवळ येथे दिनांक 02/01/2022 चे 03:00 वा. ते 04.00 वा. दरम्यान फिर्यादीची पत्नी व गावातील महीला हे मोहपा येथील विजय चौरघडे यांच्या संत्रामंडी मध्ये कामाला जातात व काम संपले की घरी परत येतात. त्यांच्या कामाला जाणे येण्यासाठी संत्रा मंडीचे मालक गाडी देतात. दि 02/01/22 चे पहाटे फिर्यादीचा पूतण्यानी फिर्यादीस फोन करून सांगीतले की, ‘संत्रा मंडीमधील पिकअप गाडीचा अपघात झाला आहे’ अशा माहितीवरून फिर्यादी हे ग्रामीण रूग्णालय काटोल येथे गेले असता कुंदा दुधकवळे हिचे कडून माहित पडले की, पिकअप गाडी क्र एमएच– 36/एफ– 3163 चे मागचे डाल्यात बसून सावनेर काटोल रोडनी परत येत असता पिकअप गाडी चे आरोपी चालक नामे– आकाश, वय 30 वर्षे रा. सवंद्री मोहपा याने आपले ताब्यातील गाडी निष्काळजीपणे भरधाव वेगाने चालवून रोडचे बाजूला असलेल्या झाडाला धडक दिली. त्यामुळे मागे बसलेल्या मजुरांपैकी फिर्यादीची पत्नी नामे 1) सौ. कमलाबाई गंगाधर परतेती वय 50 वर्ष व तिचे सोबत असलेल्या 2) मनिषा कमलेशजी सलाम वय 38 वर्ष व 3) मंजूळाबाई प्रेमदास उईके वय 40 व वर्षया मरण पावल्या असून इतर सात स्त्री पुरूष जखमी झाले आहे. तसेच गाडीचा चालक आरोपी आकाश सुध्दा जखमी झाला आहे. तसेच जखमींपैकी 4) मंजुळा वसंत धुर्वे वय 45 हिला उपचाराकरीता नागपुर ला नेत असता ती रस्यातच मरण पावली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गंगाधर बिसन परतेती वय 58 वर्ष रा अंबाडा सोनक यांचे रिपोर्ट वरुन पो. स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी जखमी असल्याने अटक नाही. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मनोज चौधरी मो.क्र. 8975755969 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर